प्रेसनोट

जा.क्र. २१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०३/२०१७

## भंडारा जिल्हा पोलीस भरती –२०१७

(पोलीस भरती करीता येणाऱ्या उमेदवारांना आवश्यक सुचना)

पोलीस शिपाई भरती २०१७ पोलीस मुख्यालय भंडारा पोलीस मैदानावर दिनांक २२/०३/२०१७ पासुन पोलीस भरती प्रक्रियेला सुरुवात झालेली आहे. पोलीस भरती करीता एकुण अर्ज ३४३९ प्राप्त झालेले आहेत. महिला ९४६ अर्ज दाखल झाले आहे. भरती करीता पोलीस अधिकारी ६० तसेच ३५० कर्मचारी लावण्यात आले आहे. भरतीकरीता चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

पोलीस भरती करीता येणाऱ्या उमेदवारांनी सकाळी ०५/०० वाजता पुासन ते ०९/०० वाजता पर्यतच यावे. आपल्या सोबत ओळखपत्र व आवश्यक ते कागदपत्रे घेवून यावे पोलीस भरतीमधील परीसरामध्ये मोबाईल आनण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. याची कृपया सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर पोलीस भरती प्रक्रीयेला येणाऱ्या उमेंदवारांनी कोणत्याही आमिषाला व गैर प्रकाराला बळी पडु नये, जर आपल्याला कोणी प्रलोभन दाखवुन भरती करुण देतो असे सांगत असेल तर सदर व्यक्तीची माहिती पोलीसांना दयावी. असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक यांनी केले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.